# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर- वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी,मिरारोड पूर्व ता.जि.ठाणे**
**फोन.नं. ०२२-२९४५१००१**
**Mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेस नोट क्र ११३** **दिनांक- २३/०४/२०२१**

## "ब्रेक द चैन" निर्देशाप्रमाणे ई- पास सुविधा कार्यान्वित.

दिनांक २१/०४/२०२१ रोजी **"ब्रेक द चैन"** संदर्भात राज्य शासनाने दिलेले निर्देशाप्रमाणे वैदयकीय कारणे, अत्यावश्यक सेवा व अंत्यविधीसारखी इ. महत्वाची कारणे वगळता आंतरजिल्हा व आंतरराज्य प्रवासास पूर्णतः मनाई करण्यात आली आहे.

सदरील आदेशात नमुद बाबीकरिता **ई-पासेस** देण्याबाबत मा. पोलीस महासंचालक कार्यालयाकडुन निर्देशित करण्यात आलेले आहे. त्या अनुंषगाने वरील करणासाठी अंतरजिल्हा व आंतरराज्य पास आवश्यक असणाऱ्या व्यक्तींनी खालील पध्दतीचा अवलंब करुन Online अर्ज करावयाचा आहे. त्यांना Online पासेस देण्यात येतील.

१) **पासेस देण्यासंदर्भातील कारणे** :- वैदयकीय कारणे, अत्यावश्यक सेवा व जवळच्या नातेवाईकांचे गंभीर आजारपण, अंत्यविधी, लग्नसमारंभ.

२)**अर्ज कोठे करावयाचा :- https://covid19.mhpolice.in** या वेबसाईट वर जाऊन सदर वेबसाईटवर आपला स्व:तचा फोटो ॲपलोड करुन आपली सविस्तर माहिती भरावी. ज्या कामानिमित्त घराचे बाहेर पडणार आहेत त्या कारणाचा संबंधित कागदपत्रे, शरिरीकदृष्टया तंदुरुस्त असलेबाबत वैद्यकीय प्रमाणपत्र व आपले स्व:तचे ओळखपत्र जोडावे. आपली ही विनंती पुर्ण झाल्यावर Submit बटण क्लीक करावे व येणारा सांकेतिक क्रमांक जतन करुन ठेवावे तसेच सदर वेबसाईटवर जाऊन आपला सांकेतिक क्रमांक टाकुन आपला ई-पास डाउनलोड करुन घ्यावा.

Online पध्दतीने ई-पास मिळवण्यास अडचण आल्यास नागरिकांनी ते राहात असलेले नजिकचे पोलीस ठाणे यांचेशी संपर्क साधुन मदत घ्यावी. ई-पास साठी स्वतः ऑनलाईन अर्ज सादर करावा.

"कोविड-१९"चे पार्श्वभूमीवर अनावश्यक प्रवास टाळून,अत्यावश्यक कारणाकरिताच सदर "ई-पास" सुविधेचा वापर करावा असे आवाहन पोलीस आयुक्त कार्यालया मार्फत करण्यात येते आहे.

Scanned by CamScanner